नोंदणी क्रं. RNI. MAHMAR/2023/84162
Registration No. MAHMAR/2023/84162

दैनिक

# यश सिद्धि न्यूज

संपादक : कमलाकर सोनकांबळे

YASH SIDDHI NEWS

वर्ष - ३ रे
Year - 3rd | अंक - १४२
Issue - 142 | वार शुक्रवार दि. १० ऑक्टोबर २०२५
Blow- Friday Date 10 October 2025 | ई-पेपर - https://epaper. yashsiddhinews.com
वेब पोर्टल - www.yashsiddhinews.com | पाने - ४
Pages - 4 | किंमत - ४.०० रुपये
Amount - 4 /- Rs | पोस्टल परवाना : SLP/298/2024-2026
ई-मेल आयडी yashsiddhinews@ gmail.com

# भारत-ब्रिटन भागीदारी जागतिक स्थैर्य आणि आर्थिक प्रगतीसाठी महत्त्वाचा आधार : प्रधानमंत्री नरेंद्र मोदी

## प्रधानमंत्री नरेंद्र मोदी व ब्रिटनचे पंतप्रधान कीर स्टार्मर यांचे संयुक्त निवेदन

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : भारत आणि ब्रिटन वेगवेगळ्या क्षेत्रात नैसर्गिक भागीदार आहेत. या संबंधांना लोकशाही, स्वातंत्र्य आणि कायद्याचे राज्य यासारख्या मूल्यांवरचा परस्पर सामायिक विश्वास आहे. सध्याच्या जागतिक अस्थिरतेच्या काळात, भारत आणि ब्रिटन दरम्यानची ही वाढती भागीदारी जागतिक स्थैर्य आणि आर्थिक प्रगतीसाठी महत्त्वाचा आधार ठरली आहे. ब्रिटनचे पंतप्रधान कीर स्टार्मर यांच्या नेतृत्वाखाली दोन्ही देशांतील संबंध अधिक दृढ झाले असून, व्यापार, तंत्रज्ञान, शिक्षण आणि संरक्षण क्षेत्रात अभूतपूर्व संधी निर्माण झाल्याचे प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी सांगितले.

ब्रिटनचे पंतप्रधान कीर स्टार्मर हे दोन दिवसांच्या भारत दौऱ्यावर आले आहेत. मुंबईतील राजभवन येथे आज त्यांची प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्याबरोबर द्विपक्षीय चर्चा झाली. या चर्चेनंतर नरेंद्र मोदी व कीर स्टार्मर यांनी संयुक्त निवेदन जारी केले. त्यावेळी प्रधानमंत्री मोदी बोलत होते.

प्रधानमंत्री मोदी म्हणाले, यावर्षी जुलै महिन्यात माझ्या ब्रिटन दौऱ्यादरम्यान ऐतिहासिक सर्वसमावेशक आर्थिक आणि व्यापार करारावर सहमती दर्शविली. या करारामुळे व्यापार आणि रोजगार निर्मिती वाढेल आणि ग्राहक तसेच उद्योग क्षेत्र दोघांनाही लाभ मिळेल. ब्रिटनचे पंतप्रधान आणि त्यांच्यासोबत आलेले आतापर्यंतचे सर्वात मोठे व्यावसायिक प्रतिनिधी मंडळ ही भागीदारीतील नव्या ऊर्जेचे द्योतक असल्याचे प्रधानमंत्री मोदी यांनी यावेळी सांगितले. दोन्ही देशांतील उद्योगक्षेत्रातील प्रतिनिधींची शिखर परिषद, सीईओ मंच आणि जागतिक फिनटेक महोत्सव यांच्या माध्यमातून सहकार्याच्या नव्या शक्यता समोर आल्याचेही त्यांनी नमूद केले.



### व्यापार, तंत्रज्ञान, शिक्षण आणि संरक्षण क्षेत्रात अभूतपूर्व संधी

प्रधानमंत्री मोदी म्हणाले, आजच्या बैठकीत दोन्ही नेत्यांमध्ये इंडो-पॅसिफिक आणि पश्चिम आशियातील स्थैर्य, तसेच युक्रेनमध्ये सुरू असलेल्या संघर्षावरही विचारांची देवाणघेवाण झाली. युक्रेन आणि गाझाच्या मुद्द्यावर भारत संवाद आणि मुत्सद्देगिरीच्या माध्यमातून शांतता पुनर्प्रस्थापित करण्यासाठीच्या सर्व प्रयत्नाचे समर्थन करतो. इंडो पॅसिफिक क्षेत्रात सागरी सुरक्षा विषयक सहकार्य वाढविण्यासाठी वचनबद्ध असल्याचे प्रधानमंत्री मोदी यांनी यावेळी सांगितले.

प्रधानमंत्री मोदी म्हणाले, ब्रिटनमधील नऊ विद्यापीठे भारतात त्यांचे कॅम्पस सुरू करत आहेत. साऊदम्टन विद्यापीठाच्या गुरूग्राम कॅम्पसचे उद्घाटन झाले असून, गिफ्ट सिटीमध्ये आणखी तीन विद्यापीठांच्या शाखा उभारल्या जात आहेत.

भारत आणि युके यांच्यातील संरक्षण सहकार्य अधिक बळकट

भारत आणि युके यांच्यातील संरक्षण सहकार्य अधिक बळकट होत असून, दोन्ही देश संयुक्त उत्पादनाच्या दिशेने पावले टाकत आहेत. याशिवाय, दोन्ही देशांच्या सैन्यदलांमध्ये सैन्य प्रशिक्षण सहकार्य (पान ४ वर...)

### भारत-ब्रिटन तंत्रज्ञान सुरक्षा उपक्रमातून नवोन्मेषाला चालना

**तंत्रज्ञान क्षेत्रात दोन्ही देशांमध्ये अमर्याद सहकार्याची क्षमता असल्याचे सांगत प्रधानमंत्री मोदी म्हणाले, आम्ही ब्रिटनची औद्योगिक तज्ञता आणि संशोधन क्षमता भारताच्या प्रतिभा व व्याप्तीशी जोडत आहोत. गेल्या वर्षी सुरू केलेल्या भारत-ब्रिटन तंत्रज्ञान सुरक्षा उपक्रमातून नवोन्मेषाला चालना मिळत आहे. खनिज क्षेत्रातील सहयोगासाठी नवीन उद्योग संघ स्थापन केला जात असून त्याचा सॅटेलाईट कॅंम्पस आयएसएम धनबाद येथे असणार आहे, अशी माहितीही प्रधानमंत्री श्री. मोदी यांनी दिली. शाश्वत विकासासाठी दोन्ही देशांनी भारत-युके ऑफशोअर विंड टास्कफोर्स आणि हवामान तंत्रज्ञान स्टार्टअप निधी स्थापन केल्याचेही त्यांनी सांगितले.**

# 'एनएचएम' कर्मचाऱ्यांना १५ टक्के मानधन वाढ

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत कंत्राटी तत्वावर कार्यरत असलेल्या कर्मचाऱ्यांना १५ टक्के इतकी मानधन वाढ देण्यात येणार आहे. याबाबत शासन मान्यता देण्यात आली असुन, राज्यभरातील पन्नास हजार (५००००) कर्मचाऱ्यांना याचा लाभ मिळणार आहे. या निर्णयामुळे राज्यभरातील कंत्राटी कर्मचाऱ्यांकडून आनंद व्यक्त होत असून सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री प्रकाश आबिटकर यांचे कर्मचाऱ्यांनी अभिनंदन केले आहे.

**आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर**

सार्वजनिक आरोग्य विभागात विविध राष्ट्रीय आरोग्य कार्यक्रमांच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी राष्ट्रीय आरोग्य अभियान (एन.एच.एम.) अंतर्गत विविध पदावर कंत्राटी तत्त्वावर कर्मचाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली आहे. या कर्मचाऱ्यांची मानधन वाढीची मागणी होती. त्या मागणीला सकारात्मक प्रतिसाद देत शासनाने १५ टक्के मानधन वाढ देण्याचा निर्णय केला आहे.

आरोग्य यंत्रणा राबवण्यामध्ये एनएचएम कर्मचाऱ्यांचा महत्त्वाचा वाटा असून त्यांच्या उर्वरित मागण्यांबाबतही शासन सकारात्मक असल्याचे आरोग्यमंत्री श्री.आबिटकर यांनी सांगितले. १० वर्षे सलग सेवा पूर्ण झालेल्या कर्मचाऱ्यांना सेवेत कायम करणे, एनएचएम कर्मचाऱ्यांना इएसआयएस अंतर्गत सामाजिक सुरक्षा लाभ देणे, कर्मचाऱ्यांसाठी गंभीर आजार, अपंगत्व, मृत्यू अशा संकटात आर्थिक सहाय्य देण्यासाठी एनएचएम कर्मचारी कल्याण निधी उभारणे, अति दुर्गम व नक्षलग्रस्त भागात कार्यरत आरोग्य कर्मचाऱ्यांना विशेष भत्ता देणे, कंत्राटी कर्मचाऱ्यांच्या मानधनातील तफावत दूर करणे, यासह इतर मागण्यांबाबत शासन सकारात्मक असून, याबाबत कार्यवाही सुरू आहे. या निर्णयामुळे कंत्राटी कर्मचाऱ्यांचे मनोबल वाढेल आणि आरोग्य विभागाची यंत्रणा अधिक परिणामकारक होईल, असा विश्वास आरोग्यमंत्री श्री.आबिटकर यांनी व्यक्त केला आहे. सद्यस्थितीत राष्ट्रीय आरोग्य अभियानात कार्यरत असलेल्या कंत्राटी कर्मचाऱ्यांना याचा लाभ मिळणार आहे. माहे जून २०२५ च्या देय मानधनावर मानधन वाढीची गणना करण्यात येणार आहे.

# संप कालावधीत महावितरणकडून राज्यातील वीजपुरवठा सुरळीत

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : वीज कर्मचाऱ्यांच्या २९ पैकी सात संघटनांच्या संयुक्त कृती समितीने गुरुवार (दि. ९) पासून सुरू केलेल्या ७२ तासांच्या बेकायदेशीर संपाच्या कालावधीत महावितरणकडून राज्यभरातील वीजपुरवठा सुरळीत ठेवण्यात आला आहे. या संपामध्ये महावितरणमधील ६२ टक्के अभियंते, अधिकारी व कर्मचारी सहभागी झाले नाहीत.

वीज कर्मचारी संघटनांच्या संयुक्त कृती समितीच्या सर्व मागण्यांशी सुसंगत व सकारात्मक भूमिका महावितरणच्या व्यवस्थापनाने यापूर्वीच बैठकीमध्ये स्पष्ट केली आहे. त्याचे लेखी इतिवृत्तही संयुक्त कृती समितीला देण्यात आले आहे. तरीही ९ ऑक्टोबरपासून ७२ तासांच्या बेकायदेशीर संपाला सुरुवात करण्यात आली आहे.

वीज ही अत्यावश्यक सेवा आहे व नागरिकांची गैरसोय होऊ नये यासाठी 'महाराष्ट्र अत्यावश्यक सेवा परिरक्षक अधिनियम' म्हणजेच 'मेस्मा' लागू करण्यात आला आहे. त्यानुसार हा संप बेकायदेशीर असल्याचे महावितरणकडून स्पष्ट करण्यात आले आहे. या तीन दिवसीय संप काळासाठी महावितरणकडून आपत्कालीन पर्यायी व्यवस्था उभारण्यात आली आहे. महावितरणमध्ये गुरूवारी (दि. ९) सुमारे ६२ टक्के कर्मचाऱ्यांची उपस्थिती होती. यासोबतच २० हजार तांत्रिक बाह्यस्त्रोत कर्मचारी (यंत्रचालक व विद्युत सहायक) कार्यरत आहेत. संपकाळात प्रामुख्याने सुरळीत वीजपुरवठ्यासाठी मुंबई येथील मुख्यालयात मुख्य अभियंता यांच्या नियंत्रणात आपत्कालीन नियंत्रण कक्ष उभारण्यात आला आहे. या कक्षाद्वारे राज्यभरातील वीजपुरवठ्यावर २४ तास लक्ष ठेवण्यात येत आहे. आवश्यकतेनुसार मनुष्यबळ व साधनसामग्रीचे नियोजन करण्यात येत आहे. यासह क्षेत्रीय कार्यालयांमध्ये देखील स्वतंत्र नियंत्रण कक्ष सुरू करण्यात आले आहेत. त्याद्वारे राज्यातील वीजपुरवठ्याची स्थिती वरिष्ठ अधिकारी व मुख्यालयास कळविण्यात येत आहे.

संपकाळातील नियोजनानुसार पर्यायी मनुष्यबळ उपलब्ध करण्यात आले आहे.

# विषारी कफ सिरपमुळे मृत्यू तांडव! उपचारादरम्यान आणखी एका चिमुकल्याचा मृत्यू; नागपूरात मृतांची संख्या १७ वर

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नागपूर : मध्य प्रदेशात चिमुकल्या लेकरांचे मृत्यूकांड घडवण्यासाठी जबाबदार असलेल्या विषारी कफ सिरपमुळे साद्याप देशभरात चिमुकल्यांचे मृत्यू तांडव सुरु असल्याचे चित्र आहे. अशातच मध्यप्रदेशातील (चरवहूर झीरवशीह) परासिया तालुक्यातील १ वर्षीय बालकाचा नागपूरच्या शासकीय वैद्यकीय रुग्णालयात उपचारादरम्यान मृत्यू झाला आहे. १ ऑक्टोबर रोजी हा बालक नागपूरच्या शासकीय वैद्यकीय रुग्णालयात उपचारासाठी दाखल झाला होता. तेव्हापासून त्याची प्रकृती अत्यवस्थ होती. गेले काही दिवस तो सातत्याने व्हेंटिलेटरवर होता.

अशातच, गुरुवारी दुपारीच मध्यप्रदेशचे मुख्यमंत्री मोहन यादव यांनी शासकीय वैद्यकीय रुग्णालयात येऊन या बालकाची प्रकृतीची विचारणा केली होती. तेव्हाच डॉक्टरांनी तो अत्यवस्थ (क्रिटिकल) असल्याची माहिती दिली होती. दरम्यान, संध्याकाळी त्या बालकाचा मृत्यू झाल्याची माहिती आहे. त्यामुळे भेसळयुक्त कफ सिरफमुळे नागपुरात उपचारादरम्यान मृत्यू झालेल्या मध्य प्रदेशातील बालकांची संख्या आता १७ झाली आहे.




दुसरीकडे, विषारी कफ सिरपमुळे राजस्थान आणि मध्य प्रदेशात झालेल्या २९ मुलांच्या मृत्यूची थक्ज ने गंभीर दखल घेतली आहे. जागतिक आरोग्य संघटनेने या घटनेबद्दल तसेच कफ सिरपच्या सुरक्षिततेबद्दल भारताला ईमेलद्वारे स्पष्टीकरण मागितले आहे. स्थानिक कफ सिरपबद्दल थक्ज ने गंभीर चिंता व्यक्त केली आहे. त्यात त्यांनी असे म्हटले आहे की, भारताने दूषित बॅचेसची निर्यात केली नसली तरी, रेकॉर्ड न केलेल्या शिपमेंटची शक्यता पूर्णपणे नाकारता येत नाही. कच्च्या मालात आणि तयार उत्पादनांमध्ये डायथिलीन ग्लायकोल आणि इथिलीन ग्लायकोलची कडक तपासणी करण्याची गरज एजन्सीने अधोरेखित केली. भारतीय कायद्यानुसार, औषध कंपन्यांना कच्च्या मालाच्या आणि अंतिम उत्पादनांच्या प्रत्येक बॅचची चाचणी करणे आवश्यक आहे. या प्रकरणांमध्ये नियमांचे उल्लंघन केले गेले आहे असे दिसते. असे हो थक्ज चे म्हणणे आहे.

तज्ञ सांगतात, खोकला आला तरी घाबरून जाण्याची गरज नाही. तो ५ ते ७ दिवसांत स्वतःहून बरा होऊ शकतो, फक्त तुमच्या मुलाला थंडीपासून दूर ठेवा.

तीव्र खोकल्यासाठी हनीटोस कफ सिरप आणि तापासाठी पॅरासिटामॉल लिहून दिले जाते. म्हणून, बालरोगतज्ज्ञांचा सल्ला घ्या.

खोकल्याचे दोन प्रकार आ-हेत: कोरडा खोकला आणि ओला खोकला. दोन्हीसाठी वेगवेगळी औषधे आणि उपचार आहेत. जर खोकला दम्यासारख्या वायुमार्गातील अडथळ्यामुळे होत असेल तर खोकला दाबण्याऐवजी, अडथळा दूर करण्यासाठी काम केले पाहिजे.

**सर्वसामान्य नागरिकांच्या समृद्धीसाठी फिनटेकचा उपयोग**

**प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांचे प्रतिपादन**

# डिजिटल क्रांतीद्वारे भारताची जागतिक महासत्तेकडे वाटचाल

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : डिजिटल क्रांतीच्या माध्यमातून भारत आत्मनिर्भरतेकडून जागतिक महासत्तेकडे वाटचाल करीत आहे. या महासत्तेच्या प्रवासात नैसर्गिक भागीदार असलेल्या ब्रिटनची भूमिका महत्वाची ठरणार आहे, असे प्रतिपादन प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी केले. फिनटेकचा उपयोग सामान्य नागरिकांच्या आयुष्यात समृद्धीसाठी करण्याचे आवाहनही त्यांनी केले.

भारताने अतिशय कुशलतेने तंत्रज्ञानाचा उपयोग करून डिजिटल व्यवहारातून सुरक्षित, शाश्वत वित्तीय व्यवस्थेचे उत्तम उदाहरण जगासमोर ठेवले असल्याचे सांगत प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी जगाला भारतासोबत भागीदारी आणि जागतिक गुंतवणूकदारांना भारताच्या जागतिक महासत्तेच्या वाटचालीत सहभागी होण्याचे आवाहन केले.

मुंबईतील जिओ वर्ल्ड सेंटर येथे जागतिक फिनटेक महोत्सव २०२५ चे आयोजन करण्यात आले होते. या महोत्सवात भारताचे प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आणि ब्रिटनचे प्रधानमंत्री कीर स्टार्मर सहभागी झाले होते.

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी म्हणाले, कृत्रिम बुद्धिमत्तेच्या मदतीने वित्त व्यवस्थेला अधिक सक्षम, कार्यक्षम आणि शाश्वत बनवण्याचा भारत प्रयत्न करीत आहे. डिजिटल वित्तीय व्यवहारांना अधिक सुरक्षित, पारदर्शक आणि समावेशक बनवण्यासाठी 'एआय' ची भूमिका निर्णायक ठरत आहे. भारताच्या कौशल्य, गुणवत्ता आणि नवोन्मेष क्षमतेमुळे भारतीय उत्पादने जगभरात स्पर्धात्मक ठरत आहेत. त्यामुळे भारत जागतिक पुरवठा साखळीचा एक मजबूत आणि विश्वासार्ह भाग बनला आहे. आत्मनिर्भर भारत या उपक्रमांमुळे स्थानिक उत्पादनांना चालना मिळाली असून, जागतिक गुंतवणूकदार भारताकडे अधिक विश्वासाने पाहत आहे. भारताने डिजिटल तंत्रज्ञानाचे लोकशाहीकरण केले आहे, जे प्रत्येक नागरिकासाठी आणि देशातील प्रत्येक प्रदेशासाठी सुलभ आणि सहज उपलब्ध आहे.

ब्रिटनचे प्रधानमंत्री कीर स्टार्मर म्हणाले, भारतासोबतची भागीदारी दोन्ही देशांच्या परस्पर प्रगतीला चालना देणारी असून ही सामायिक प्रगतीच्या नव्या युगाची सुरुवात आहे. यासाठी दोन्ही देशांदरम्यानच्या व्यापक आर्थिक आणि व्यापार करारातून (उएढ) निमर्ण होणाऱ्या नव्या संधींवर भर दिला जाणार आहे. भारत आणि ब्रिटन हे नैसर्गिक भागीदार आहेत. जगातील सर्वात मोठी लोकशाही आणि जलदगतीने वाढणाऱ्या अर्थव्यवस्थांपैकी भारत आहे. भारताच्या लोकसंख्येच्या अर्ध्याहून अधिक लोकसंख्या २५ वर्षांखाली वय असणाऱ्यांची आहे. या देशाची ऊर्जा आणि क्षमता विशेषतः मुंबईत स्पष्टपणे दिसते. तसेच, जेव्हा ही क्षमता ब्रिटन सोबत एकत्र येईल, तेव्हा 'यूके' फिनटेक नवकल्पनांसाठी आणखी उत्तम केंद्र बनवता येईल. डिजिटल पायाभूत सुविधा, कृत्रिम बुद्धिमत्ता आणि डेटा क्षेत्रात गुंतवणूक करत आहोत. तसेच जागतिक प्रतिभेला आकर्षित करण्यासाठी जलद परवाना प्रक्रिया आणि नवीन व्हिसा मार्ग सुरू करत आहोत. या महोत्सवाच्या माध्यमातून व्यवसाय व रोजगार यासाठी फायदा होणार असल्याचेही त्यांनी सांगितले.

या महोत्सवाच्या निमित्ताने जगभरातील नवोन्मेषकार, धोरणकर्ते, केंद्रीय बँकांचे प्रतिनिधी, नियामक, गुंतवणूकदार, शिक्षणतज्ज्ञ आणि उद्योग क्षेत्रातील मान्यवर एकत्र आले होते.



## संपादकीय....

### मृत्यूतांडव

मध्य प्रदेशात चिमुकल्या लेकरांचे मृत्यूकांड घडवण्यासाठी जबाबदार असलेल्या विषारी कफ सिरपमुळे साद्याप देशभरात चिमुकल्यांचे मृत्यू तांडव सुरु असल्याचे चित्र आहे. अशातच मध्यप्रदेशातील परासिया तालुक्यातील १ वर्षीय बालकाचा नागपूरच्या शासकीय वैद्यकीय रुग्णालयात उपचारादरम्यान मृत्यू झाला आहे. मध्यप्रदेशचे मुख्यमंत्री मोहन यादव यांनी शासकीय वैद्यकीय रुग्णालयात येऊन या बालकाची प्रकृतीची विचारणा केली होती. तेव्हाच डॉक्टरांनी तो अत्यवस्थ (क्रिटिकल) असल्याची माहिती दिली होती. दरम्यान, संध्याकाळी त्या बालकाचा मृत्यू झाल्याची माहिती आहे. त्यामुळे भेसळयुक्त कफ सिरफमुळे नागपुरात उपचारादरम्यान मृत्यू झालेल्या मध्य प्रदेशातील बालकांची संख्या आता १७ झाली आहे. विषारी कफ सिरपमुळे राजस्थान आणि मध्य प्रदेशात झालेल्या २९ मुलांच्या मृत्यूची थक्ज ने गंभीर दखल घेतली आहे. जागतिक आरोग्य संघटनेने या घटनेबद्दल तसेच कफ सिरपच्या सुरक्षिततेबद्दल भारताला ईमेलद्वारे स्पष्टीकरण मागितले आहे. स्थानिक कफ सिरपबद्दल थक्ज ने गंभीर चिंता व्यक्त केली आहे. त्यात त्यांनी असे म्हटले आहे की, भारताने दूषित बॅचेसची निर्यात केली नसली तरी, रेकॉर्ड न केलेल्या शिपमेंटची शक्यता पूर्णपणे नाकारता येत नाही. कच्च्या मालात आणि तयार उत्पादनांमध्ये डायथिलीन ग्लायकोल आणि इथिलीन ग्लायकोल ची कडक तपासणी करण्याची गरज एजन्सीने अधोरेखित केली. भारतीय कायद्यानुसार, औषध कंपन्यांना कच्च्या मालाच्या आणि अंतिम उत्पादनांच्या प्रत्येक बॅचची चाचणी करणे आवश्यक आहे. या प्रकरणांमध्ये नियमांचे उल्लंघन केले गेले आहे असे दिसते.

# भारत देशाचे एक रत्न म्हणजे रतन टाटा: एक वर्षानंतरही जिवंत आठवणी कायम


**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

गेल्या वर्षी आजच्याच दिवशी, ९ ऑक्टोबर २०२४ रोजी, भारताच्या उद्योगजगतातील एका युगाचा अंत झाला. अखंड भारताचे रत्न हरपले.. सर रतन टाटा काळाच्या पडद्या आड गेले...

रतन नवल टाटा, ज्यांना आपण स्नेहाने 'बॉस' म्हणत असू, त्यांचे वयाच्या ८६व्या वर्षी मुंबईतील बाम्बे हॉस्पिटलमध्ये निधन झाले. ते एक उद्योगपती नव्हते, तर एक द्रष्टा, परोपकारी आणि साधेपणाचा प्रतीक होते. त्यांच्या जाण्यानंतर एक वर्ष पूर्ण झाले, तरी त्यांच्या आठवणी आजही प्रत्येक भारतीयाच्या हृदयात जिवंत आ-हेत. टाटा समूहाच्या माध्यमातून त्यांनी केवळ व्यवसाय वाढवला नाही, तर लाखो लोकांना रोजगार, स्वप्ने आणि नैतिकतेचे धडे दिले. आज, या विशेष दिवशी, ढउड सारख्या कंपन्यांनीही त्यांच्या स्मृतीसाठी कार्यक्रम रद्द केले आहेत, जणू काही संपूर्ण देश शोकसभेत बसला आहे.

रतन टाटांचा जन्म २८ डिसेंबर १९३७ रोजी मुंबईतील एका पारशी कुटुंबात झाला. नवल टाटा आणि शोहनू कोलहाटकर यांचे दत्तकपुत्र म्हणून त्यांचे बालपण आझाद मैदान परिसरात गेले. लहानपणापासूनच कुटुंबातील कलहामुळे त्यांना आई-वडिलांच्या विभक्ततेचा सामना करावा लागला. त्यांच्या आजी नवजबाई टाटा यांनी त्यांचे लालन-पालन केले, ज्यामुळे त्यांच्या व्यक्तिमत्वात साधेपणा आणि संवेदनशीलता रुजली. स्वातंत्र्यपूर्व काळातील आठवणी सांगताना ते म्हणाले होते, तेव्हा इंग्रजांच्या वाहनांच्या पेट्रोल टाकीत साखर टाकायचो, कारण आम्हाला ते आवडत नव्हते. हा बालपणीचा खट्याळ किस्सा त्यांच्या देशभक्तीचा प्राथमिक दृष्टिकोन दाखवतो.

अमेरिकेतील कॉर्नेल विद्यापीठातून आर्किटेक्चर पदवी घेतल्यानंतर, १९६२ मध्ये ते भारतात परतले आणि टाटा समूहात सामील झाले. जमशेदपूरच्या टाटा स्टील कारखान्यात कामगार म्हणून सुरुवात केली - उघड्या पायांनी कारखान्याच्या फ्लोअरवर चालत, माणसांना समजून घेण्याचा प्रयत्न करत. ही आठवण सांगताना ते नेहमी म्हणत, मी नेहमी तळाशी असलेल्या लोकांशी




बोलतो, कारण ते खऱ्या अर्थाने कंपनी चालवतात. १९७० च्या दशकात नेल्को आणि नॅशनल रेडिओ कॉर्पोरेशनसारख्या अडचणीत सापडलेल्या कंपन्यांचे ते प्रमुख झाले आणि त्यांना उभे केले. १९९१ मध्ये जे.आर.डी. टाटा यांच्या निवृत्तीनंतर त्यांना टाटा समूहाचे अध्यक्षपद मिळाले. तेव्हा समूहाची उलाढाल १० अब्ज डॉलर होती; २०१२ पर्यंत ती १०० अब्ज डॉलर झाली. टेटली टी, जगुआर लँड रोव्हर, कोरस स्टीलसारख्या जागतिक ब्रँड्सचे अधिग्रहण करून त्यांनी 'सॉल्ट टू सॉफ्टवेअर' ही संकल्पना प्रत्यक्षात आणली.

पण रतन टाटांचे खरे वैभव त्यांच्या परोपकारात होते. टाटा ट्रस्टद्वारे त्यांनी शिक्षण, आरोग्य आणि ग्रामीण विकासासाठी अरबो डॉलर्स खर्च केले. २६/११ च्या मुंबई हल्ल्यात अपंग झालेल्या ताज हॉटेलच्या कर्मचाऱ्यांना त्यांनी वैयक्तिकरित्या मदत केली. 'टाटा नॅनो' - 'लोकांच्या कार' - ही कल्पना गरीबांसाठी वाहन उपलब्ध करून देण्याची होती, जरी ती व्यावसायिकदृष्ट्या आव्हानात्मक ठरली तरी तिची भावना कायम आहे. त्यांच्या शेवटच्या दिवसांतही, त्यांच्या वसीयतनाम्यात १०,००० कोटी रुपयांचे दान नमूद आहे - कुटुंब, मित्र, कर्मचारी आणि संस्थांसाठी. त्यांचा शिष्य शांतनू नायडू यांना विशेष उल्लेख आहे, जो त्यांच्या वैयक्तिक आयुष्यातील एक सुंदर अध्याय आहे.

व्यक्तिगत आयुष्यात रतन टाटा एकाकी राहिले. अविवाहित असले तरी त्यांच्या आयुष्यात अनेक भावनिक क्षण होते. एकदा ते म्हणाले होते, जीवनातील उतार-चढाव महत्त्वाचे आहेत. अगदी ईसीजीमध्ये सरळ रेषा म्हणजे मृत्यू. त्यांचे हे अनमोल विचार आजही लाखो लोकांना प्रेरित करतात: तुम्ही नेहमी सत्यासाठी उभे राहा आणि निष्पक्ष राहा. मराठी कलाकारांनीही त्यांच्या जाण्यावर हळहळ व्यक्त केली. लेखक क्षितीज पटवर्धन म्हणाले, ज्यांनी रोजगारच नाही तर अगणित स्वप्ने दिली... तर संगीतकार सलील कुलकर्णी यांनी त्यांच्या साधेपणाचे कौतुक केले.

आज, एक वर्षानंतर, रतन टाटांच्या आठवणी केवळ शोक नव्हे, तर प्रेरणा आहेत. ते म्हणाले होते, व्यवसाय हा फक्त पैसा कमावण्यासाठी नाही, तर समाजाला परत देण्यासाठी आहे. टाटा समूहाने त्यांच्या वारशाला पुढे नेले आहे - ढउड सारख्या कंपन्या आजही त्यांच्या तत्त्वांवर चालतात. पण खरी आठवण ही आहे: एक माणूस जेव्हा साधेपणा आणि द्रष्टेने जगतो, तेव्हा तो अमर होतो. रतन टाटा, तुमच्या आठवणींनी आमचे जीवन समृद्ध आहे. नमस्कार!

**- मुंबई, ९ ऑक्टोबर २०२५ :**
**विजय घनघाव**

# नवरात्र महोत्सव व कोजागिरी पौर्णिमेनिमित्त आयोजित आरोग्य तपासणी शिबिराची सांगता

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर : रोटरी ई क्लब ऑफ सोलापूर इलाईट, श्री. रूपाभवानी देवस्थान ट्रस्ट, फॅमिली प्लॅनिंग असोसिएशन ऑफ इंडिया, सोलापूर शाखा, महाराष्ट्र राज्य एड्स प्रतिबंध सोसायटी, जिल्हा एड्स प्रतिबंध व नियंत्रण विभाग, सोलापूर, जिज्ञासा महानगर, सोलापूर, नॅशनल इंटिग्रेटेड मेडिकल असोसिएशन सोलापूर, निमा वुमन्स फोरम, सोलापूर दयानंद कला व विज्ञान महाविद्यालय एन. एस. एस. विभाग व विश्व हिंदू महासंघ (भारत) शाखा सोलापूर यांच्या संयुक्त विद्यमाने श्री. रूपाभवानी देवस्थान सोलापूर येथे २३ सप्टेंबर ते १ ऑक्टोबर नवरात्र महोत्सवात सोलापूरच्या आराध्य दैवत श्री. रूपाभवानी मातेच्या दर्शनासाठी सोलापूर शहराच्या विविध भागातून येणाऱ्या भाविकांकरिता व पुढे ३ ऑक्टोबर ते ६ ऑक्टोबर २०२५ पर्यंत महाराष्ट्रातील विविध जिल्ह्यातून, तेलंगणा, आंध्र व कर्नाटक राज्यातून सोलापूर मार्गे पायी कोजागिरी



पौर्णिमेनिमित्त तुळजापूर मातेच्या दर्शनासाठी जाणाऱ्या भाविकांकरिता मोफत आरोग्य तपासणी शिबिरांचे आयोजन करण्यात आले होते.

या आयोजित करण्यात आलेल्या आरोग्य तपासणी शिबिरात भाविकांकरिता रक्तदाब, वजन, हिमोग्लोबिन, रक्तगट, शुगर, आयसीटीसी आदींच्या तपासण्या करण्यात आल्या, गायनिक तपासणी व उपचार, गरोदर व स्तनदा महिलांची तपासणी उपचार, युरोलॉजिकल तपासणी उपचार, जेंडर व एम्पॉवरमेंट समुपदेशन, कॅन्सर मार्गदर्शन व समुपदेशन, गरजू भाविकांना संदर्भसेवा याविषयी माहिती देण्यात आली व सर्वसामान्य तपासणी करून मोफत औषधोपचार देण्यात आला. १३ दिवस चाललेल्या या आरोग्य तपासणी शिबिराचा एकूण ७५०० देवी भक्तांनी लाभ घेतला असल्याची माहिती डॉ. श्रीकांत येळेगावकर यांनी दिले. शिबिरात नॅशनल इंटिग्रेटेड मेडिकल असोसिएशन अर्थात निमाचे डॉक्टर्स, जिज्ञासा महानगर सोलापूरचे डॉक्टर्स, डॉ. सिद्धाराम चोरमले, डॉ. कविता चंडक, लॅब टेक्निशन व्यंकटेश कंची, सत्यभामा कांबळे, बालकृष्ण बेंडकाळे, समुपदेशक शितलकुमार गायगवळी, सोशल वर्कर आकाश गायकवाड, कल्पना गडगडे, परिचारिका सुकेशनी सोनकांबळे यांनी भाविकांना आरोग्य सेवा दिल्या.

रोटरी ई क्लब ऑफ सोलापूर इलाईटचे अध्यक्ष बालमुकुंद राठी, सचिव रोशन भुताडा, राहुल डांगरे, फॅमिली प्लॅनिंग असोसिएशन ऑफ इंडिया सोलापूर शाखेचे मार्गदर्शक प्रा. डॉ. श्रीकांत येळेगावकर, चेअरपर्सन प्रा. डॉ. एन. बी. तेली, ब्रांच मॅनेजर सुगतरत्न गायकवाड, श्री. रूपाभवानी देवस्थान ट्रस्टचे अध्यक्ष मल्लिनाथ मसरे, निमा सोलापूर शाखेचे

### शिबिर यशस्वी केलेल्या डॉक्टरांचा व विद्यार्थ्यांचा केला सत्कार

अध्यक्ष नागनाथ जिड्डीमणी, सचिव डॉ. अभिजीत पुजारी, निमा वुमन्स फोरमच्या अध्यक्षा डॉ. श्रुती मराठे, डॉ. अश्विनी देगावकर, दयानंद कला व विज्ञान महाविद्यालय एन.एस.एस. विभागाच्या प्रा. डॉ. सुचित्रा पाटणकर, डापकूचे जिल्हा कार्यक्रम अधिकारी कृष्णा सकट, सांख्यिकी अधिकारी दिनेश राठोड, विश्व हिंदू महासंघ पश्चिम महाराष्ट्र अध्यक्ष नंदकुमार झंवर, डॉ. सतीश आनंदकर आदींनी दररोज आरोग्य तपासणी शिबिरास भेट देऊन कार्यकर्त्यांना मार्गदर्शन केले.

आरोग्य तपासणी शिबिर यशस्वी करण्यासाठी परिश्रम घेतलेल्या जिज्ञासा महानगरच्या डॉक्टरांचा, दयानंद कला व विज्ञान महाविद्यालय, एन. एस. एस. विभाग तसेच दयानंद वाणिज्य महाविद्यालय एन. एस. एस. विभाग व वालचंद कला व विज्ञान महाविद्यालय समाजकार्य विभागाच्या विद्यार्थ्यांचा व फॅमिली प्लॅनिंगच्या कर्मचाऱ्यांचा मल्लिनाथ मसरे, प्रा. डॉ. श्रीकांत येळेगावकर, प्रा. डॉ. सुचित्रा पाटणकर, बालमुकुंद राठी, राहुल डांगरे, सुगतरत्न गायकवाड यांच्या हस्ते प्रमाणपत्र देऊन गौरव करण्यात आला. श्री. रूपाभवानी देवस्थानच्या वतीने कोजागिरी पौर्णिमेसाठी जाणाऱ्या भाविकांना सोज्वळ तुपातील शिरा प्रसाद देऊन शिबिराची सांगता करण्यात आली.

# भटक्या विमुक्तांची जिल्हास्तरीय समितीची अशासकीय सदस्यपदी निवड






**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

अक्कलकोट प्रतिनिधी : राज्य शासनाच्या विमुक्त जाती व भटक्या जमातीच्या कल्याणासाठी विविध योजना राबविल्या जातात. या योजनांचा लाभ मिळवून देण्यासाठी स्थापन केलेल्या जिल्हास्तरीय समितीवर सोलापूर जिल्ह्यातील चार कार्यकर्त्यांची अशासकीय सदस्य म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे.त्यात अक्कलकोट येथील जेऊरवाडीचे संजय राठोड याचा समावेश आहे

इतर मागास बहुजन कल्याण विभागाच्या वतीने काढण्यात आलेल्या आदेशानुसार राज्य शासनाने ही समिती नियुक्त केली आहे. सोलापूर जिल्हास्तरीय समितीवर संतोष वसंतराव शिर्के (सोलापूर), सुनील

### संजय राठोड सुनील पवार, संतोष शिर्के, निशांत परदेशी, संजय राठोड यांची निवड

तमन्ना पवार (पेनूर, ता.मोहोळ), निशांत निरंजन परदेशी (भाग्यश्री पार्क, होटगी रोड, सोलापूर), संजय धोंडू राठोड (जेऊरवाडी, ता.अक्कलकोट) यांची अशासकीय सदस्य म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे.

विमुक्त जाती, भटक्या जमातीच्या पात्र नागरिकांना प्रमाणपत्रे व शासकीय योजनांचा लाभ मिळण्यात येणाऱ्या अडचणी सोडविणे, विविध प्रमाणपत्रे देण्यासाठी प्रशासकीय अधिकाऱ्यांच्या समन्वयातून काम करणे आदींसाठी ही समिती काम करणार आहे.

## विरुद्ध दिशेने येऊन दुचाकीला दिली धडक

सोलापूर/प्रतिनिधी : ट्रिपल सीट दुचाकी वरून विरुद्ध दिशेने येऊन दुचाकीला धडक देऊन दुचाकीचे नुकसान केल्याची घटना २९ सप्टेंबर रोजी रात्री साडेआठ वाजण्याच्या दरम्यान जगताप हॉस्पिटलच्या विरुद्ध दिशेने सोलापूर येथे घडली याप्रकरणी शकील लतीफ आत्तार (रा.दमानी नगर) यांनी फौजदार चावडी पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे. त्यांच्या फिर्यादीवरून हेगडे (पूर्ण नाव पत्ता माहीत नाही) याच्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे. माहिती अशी की, फिर्यादी हे डी मार्ट कडे जाताना वरील संशयित आरोपी याने ट्रिपल सीट दुचाकी वरून विरुद्ध दिशेने येऊन फिर्यादी यांच्या दुचाकीला धडक दिली व चार हजार रुपयांची नुकसान केले. तसेच फिर्यादी यांना जखमी करत फिर्यादी यांचे गाडीचा व दवाखान्याचा खर्च देतो म्हणून असे सांगितल्याने फिर्यादी यांनी त्याच्या मोबाईल नंबर वर फोन केला असता, काल तूच मला दारू पिऊन धडक दिला,उलट मीच तुझ्याविरुद्ध तक्रार देतो की तू माझ्याकडून पाच हजार रुपये घेतला व अजून पैशाची मागणी करतो.तू मला फोन केला तर तुला बघून घेईल अशी धमकी दिली आहे.असे फिर्यादीत नमूद आहे. तपास पोलीस हेड कॉन्स्टेबल पवार हे करीत आहेत.

# सावरकर विद्यालयात डॉ. वसंतराव पवार यांना अभिवादन

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

निफाड/प्रतिनिधी : मराठा विद्या प्रसारक समाज संचलित स्वा. सावरकर विद्यालय कोठुरे येथे कर्मवीर डॉ. वसंतराव पवार यांना स्मृतिदिनी अभिवादन करण्यात आले.

याप्रसंगी व्यासपीठावर विद्यालयाचे मुख्याध्यापक सातपुते सुनील हे कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होते. यावेळी उपस्थित मान्यवरांच्या हस्ते प्रतिमापूजन करण्यात आले.असुन, शिक्षक रोशन दवते यांनी डॉ,पवार यांच्या कार्यकर्तृत्वाची जाणीव विद्यार्थ्यांना विविध उदाहरणांच्या



सहाय्याने करून दिली. डॉ. पवार यांचे सामाजिक ,आर्थिक ,राजकीय, शैक्षणिक ,सांस्कृतिक, कृषी व वैद्यकीय क्षेत्रातील कामाची ओळख विद्यार्थ्यांना करून दिली., तसेच आडगाव येथील मावीप्र संचलित डॉ.वसंतराव पवार वैद्यकीय महाविद्यालयाच्या माध्यमातून अनेक गरजूंवर मोफत शस्त्रक्रिया केल्या जातात गरजूंनी त्याचा लाभ घ्यावा असे आवाहन केले. कार्यक्रमाचे अध्यक्ष सुनील सातपुते यांनी डॉ,वसंतराव पवार यांच्या सामाजिक सांस्कृतिक व शैक्षणिक कार्याविषयी मनोगतात म्हणाले की साहेबांनी शिस्त, गुणवत्ता व पारदर्शकता या त्रिसूत्रीच्या आधारे संस्थेचा आलेख कसा उंचावला हे विद्यार्थ्यांना समजावून सांगितले. साहेबांविषयी मविप्र संस्थेतील कर्मचाऱ्यांमध्ये असणारी आदर युक्त भीती उदाहरणांच्या साह्याने विद्यार्थ्यांना समजावून सांगितले.या प्रसंगी प्रियंका आव्हाड, विद्यार्थ्यां.श्लोक उगले, रुद्र उलारे यांनी मनोगत व्यक्त केले,कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्राची मोगल व ईश्वरी मोगल यांनी केले. तर कार्यक्रमाचे यशस्वीतेसाठी सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी विद्यार्थी यांनी परिश्रम घेतले.




# बालाजी अमाईन्स लिमिटेडला 'रोटरी इंडिया नॅशनल CSR अवॉर्ड' - आरोग्य क्षेत्रातील उत्कृष्ट कार्याबद्दल गौरव

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर : प्रतिनिधी/नागेश श्रीचिप्पा : रोटरी इंडियाच्या वतीने देशभरातील उद्योगसमूहांच्या सामाजिक जबाबदारीतील (CSR) उल्लेखनीय योगदानाची दखल घेत रोटरी इंडिया नॅशनल उडठ अवॉर्ड २०२५ जाहीर करण्यात आले. या प्रतिष्ठित पुरस्कारांमध्ये बालाजी अमाईन्स लिमिटेडने पश्चिम विभागातील मोठ्या उद्योगसमूह (Large Scale Enterprise) या गटात आरोग्य क्षेत्रासाठी (Health-care) सर्वोत्तम उडठ कार्याचा पुरस्कार पटकावला आहे.

हा पुरस्कार कंपनीचे महाव्यवस्थापक (वित्त) श्री. अरुण मासाळ यांनी स्वीकारला. पुरस्कार वितरण समारंभ मोतिलाल ओसवाल टॉवर, प्रभादेवी, मुंबई येथे ८ ऑक्टोबर २०२५ रोजी पार पडला. या कार्यक्रमाचे मुख्य अतिथी श्री. मोतिलाल ओसवाल तर विशेष अतिथी अभिनेता व समाजसेवक श्री. सोनू सूद होते.

बालाजी अमाईन्स लिमिटेड ही सोलापूरातील अलिफॅटिक अमाईन्स आणि स्पेशालिटी केमिकल्स निर्मिती क्षेत्रातील अग्रगण्य कंपनी असून, व्यावसायिक यशासोबतच कंपनीने सामाजिक जबाबदारीच्या क्षेत्रात विशेषत: आरोग्य सेवेच्या उन्नतीसाठी उल्लेखनीय योगदान दिले आहे.

कोविड काळापासून कंपनी सातत्याने आरोग्यसेवेच्या बळकटीसाठी काम करत असून, सोलापूर शहरात तीन रुग्णालयांचे नूतनीकरण केले आहे. आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांसाठी विनामूल्य किंवा अत्यल्प किंमतीत सेवा या रुग्णालयांच्या माध्यमातून गरजुंना मिळत आहे. या रुग्णालयांमध्ये आता अत्याधुनिक सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या असून त्या कोणत्याही कॉर्पोरेट रुग्णालयांच्या तोडीस तोड आहेत. या प्रसंगी कंपनीचे व्यवस्थापकीय संचालक श्री. डी. राम रेड्डी यांनी सांगितले की, कंपन्यांवर उडठची जबाबदारी लागू होण्यापूर्वीच, आमच्या व्यवस्थापनाने १९९० च्या दशकापासून बालाजी फाउंडेशनच्या माध्यमातून समाजसेवा सुरू केली होती. आरोग्य, शिक्षण आणि क्रीडा या क्षेत्रांमध्ये आम्ही सतत कार्यरत आहोत. आमचे चेअरमन श्री. ए. प्रताप रेड्डी म्हणतात कि आपण समाजाच्या ऋणात आहोत, ज्या समाजाने आपल्याला खूप काही दिले, ते परत द्यावे हीच खरी सामाजिक जबाबदारी आहे. आज रोटरी इंडियाकडून हा सन्मान मिळाल्याचा आम्हाला अभिमान आणि आनंद वाटतो.

हा पुरस्कार बालाजी अमाईन्स लिमिटेडच्या समाजाभिमुख दृष्टीकोनाचा आणि दीर्घकालीन सामाजिक बांधिलकीचा गौरव असून, कंपनीने आरोग्य, शिक्षण आणि समाजकल्याण या क्षेत्रांमध्ये उभारलेले कार्य इतरांसाठी प्रेरणादायी ठरले आहे.

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी मुद्रक, प्रकाशक, संपादक कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार, रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ, सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु. पो. गोगांव ता. अक्कलकोट जि. सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. **संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे** ई-मेल - yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com Mo. 9921988358

This Newspaper is printed by the Owner Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur-413002 (Maharashtra), Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 (Maharashtra). Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

■ **प्रशासकीय कार्यालय** : सम्यक उद्योग समूह, पृथ्वी एंटरप्राइजेस, सर्वे नं. ६५९/८, शॉप नं. ४, राजीव गांधी नगर, न्यू अप्पर बस स्टॉप, बिबवेवाडी पुणे-३७ ■ **विभागीय कार्यालय** : प्रबुद्ध इंटरप्राइजेस, दुकान नं. २ अमरधान चौक, खेमानी उल्हासनगर ४२१००२

# धाराशिव जिल्हा अधिकारी कचेरीवर एस. टी. आरक्षणासाठी बंजारा समाजाचा धडकला महामोर्चा

## जालना विधान परिषद मतदारसंघातील आमदार राजेश राठोड यांची केंद्र सरकारवर सडकून टीका केली

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

वागदरी/एस.के.गायकवाड : धाराशिव जिल्ह्यातील सकल बंजारा समाजाच्या वतीने बंजारा समाजाचा एस टी आरक्षण प्रवर्गात समावेश करावा या मागणीसाठी धाराशिव जिल्हाधिकारी कार्यालयावर प्रचंड मोर्चा धडकला.

दिनांक ८ ऑक्टोबर २२५ रोजी धाराशिव जिल्ह्यातील सकल बंजारा समाजाच्या वतीने बंजारा समाजाचा आरक्षणाच्या एस टी प्रवर्गामध्ये सम ावेश करावा या मागणीसाठी मोर्चाचे आयोजन करण्यात आले होते.




धाराशिव येथील बार्शी नाका येथून पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या पुतळ्यास पुष्प-हार अर्पण करून या मोर्चाला सुरुवात करण्यातआली. बार्शी नाका ते महामानव डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर चौक या ठिकाणीही उपस्थित मान्यवरांच्या हस्ते भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या पूर्णाकृती पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून हा मोर्चा छत्रपती शिवाजी महाराज चौकात आला. या ठिकाणी चौकातील रयतेचे राजे छत्रपती शिवाजी महाराज यांच्या अश्वरूढ पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून हा मोर्चा थेट जिल्हा अधिकारी कार्यालयावर धडकला.या ठिकाणी या मोर्चाचे जाहीर सभेत रूपांतर झाले. यांप्रसंगी बोलताना विधान परिषद मतदार संघ जालना चे आम दार राजेश राठोड यांनी देशाच्या सत्तेवर असलेल्या मोदी सरकारवर प्रचंड नाराजी व्यक्त करताना ते म्हणाले की या देशावर २१४ पासून ते आज जागाया बंजारा समाजाच्या मतावर मोदी सरकार सत्तेवर आहे. गेल्या अनेक वर्षापासून ची बंजारा समाजाची ही मागणी असून या मागणीकडे सरकार जाणिव पूर्वत दुर्लक्ष करीत आहे. ही अत्यंत खेद जनकबाब आहे.मोदी सरकारने या गोरगरीब भटक्या आदिवासी बंजारा समाजाच्या मागणीकडे जातीने लक्ष देऊन बंजारा समाजाचा एस टी आरक्षणामध्ये समावेश करावा अन्यथा भविष्यात बंजारा समाजाला वेगळा विचार करावा लागेल.याप्रसंगी माजी खासदार हरिभाऊ राठोड,गोर सिकवाडी लढाऊ विजय चव्हाण,तुळजापूर तालुक्यातील अलियाबाद च्या माजी सरपंच ज्योतिका चव्हाण,लक्षण चव्हाण,अपेक्षा जाधव आदींची ही मार्गदर्शनपर भाषणे झाली.यावेळी धाराशीचे जिल्हा परिषदेचे माजी सदस्य तथा बंजारा समाजाचे नेते प्रकाश चव्हाण म्हणाले की बंजारा समाजाचा एस टी प्रवर्गामध्ये समावेश करण्यासाठी जे काही निकष ठरवले गेले आहेत त्या सर्व निकषांमध्ये बंजारा समाज बसतो त्यामुळे सरकारला या समाजाचा एस टी प्रवर्गामध्ये समावेश करण्यासाठी कसलीही अडचण येत नाही तेव्हा शासनाने या मागणीचा तात्काळ विचार करून बंजारा समाजाचा एसटी प्रवर्गामध्ये समावेश करावा अशी मागणी त्यांनी यावेळी केली. या मोर्चामध्ये विलास राठोड,हरिष जाधव, सुरेश पवार, दिलीप जाधव, वैभव जाधव, आमृता चव्हाण, योगेश राठोड, अतुल राठोड सह धाराशिव जिल्ह्यातील वाडी वस्ती तांड्यातून मोठ्या प्रमाणात महिला,ग्रामस्थ युवा कार्यकर्ते सर्वपक्षीय कार्यकर्ते नेते सखल बंजारा समाजाच्या बॅनरखाली प्रचंड संख्येने उपस्थित होते.या वेळी सदर मागण्याचे निवेदन सकल बंजारा समाजाच्या शिष्ठमंडळाने धाराशिव चे जिल्हाधिकारी यांना दिले.

---

# राष्ट्रवादी कॉंग्रेस शरद पवार पक्ष तालुकाध्यक्षांच्या निवडी जाहीर : वसंतनाना देशमुख

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**



पंढरपूर/प्रतिनिधी : राष्ट्रवादी कॉंग्रेस शरदचंद्रजी पवार पक्षाच्या सोलापूर जिल्हा पदाधिकारी तसेच तालुकाध्यक्ष पदाच्या निवडी जाहीर करण्यात आला असल्याची माहिती सोलापूर जिल्हा अध्यक्ष वचन नाना देशमुख यांनी दिली.

लवकर नगरपालिका व नगरपरिषद, महानगरपालिका जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुका जाहीर होतील. त्या दृष्टीने पक्ष बांधणी करणे गरजेचे आहे राष्ट्रवादी कॉंग्रेस चर्चेंद्र पवार पक्षाचे विचार तळागाळापर्यंत पोहोचवण्यासाठी नवीन कार्यकारणी करणे गरजेचे आहे.

या दृष्टीने सोलापूर जिल्ह्यातील दहा तालुका अध्यक्षांच्या निवडी पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष शरदचंद्रजी पवार पक्षाचे प्रदेशाध्यक्ष शशिकांत शिंदे, माझी प्रदेशाध्यक्ष आ. जयंत पाटील व माजी उपमुख्यमंत्री विजयसिंह मोहिते पाटील, माजी मंत्री प्राध्यापक लक्ष्म णराव ढोबळे, माजी मंत्री हर्षवर्धन पाटील, खा. सुप्रिया सुळे, आ. रोहित पवार, खा. धैर्यशील मोहिते पाटील, आ. अभिजीत पाटील, आ. उत्तम राव जानकर, आ. नारायण पाटील, आ. राजू खरे यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्हाध्यक्ष वसंतराव देशमुख व जिल्हा कार्याध्यक्ष रवींद्र भाऊ पाटील यांनी तालुकाध्यक्ष पदाच्या निवडी जाहीर केल्या.

माळशिरस देविदास डोपे, माढा बाळासाहेब पाटील, अक्कलकोट बंदी नवाज कोरबू, करमाळा अमरजीत साळुंखे, दक्षिण सोलापूर दत्तात्रय बोडके, मोहोळ विजयकुमार पाटील, पंढरपूर अतुल चव्हाण, मंगळवेढा पांडुरंग चौगुले, बार्शी महेश चव्हाण, सांगोला दत्तात्रय सावंत, यांच्या निवडी जाहीर करण्यात आल्या.

लवकरच शहराध्यक्ष व जिल्हा कार्यकारिणी मतदारसंघ अध्यक्ष व इतर सर्व निवडी जाहीर करण्यात येणार असल्याचे सोलापूर जिल्हा अध्यक्ष वसंतराव देशमुख यांनी सांगितले.

---

# जिजाऊ ज्ञान मंदिर च्या विद्यार्थ्यांचे घवघवीत यश

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**



सोलापूर प्रतिनिधी/ नागेश श्रीचिप्पा : जिल्हा युवक संचालनालय विभाग पुणे यांच्या मार्फत घेण्यात आलेल्या उत्तर सोलापूर तालुकास्तरीय स्पर्धा योग्य नियोजनात पार पडला.

या स्पर्धेत जिजाऊ ज्ञान मंदिर व विजयसिंह मोहिते पाटील महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी सांगीक आणि वैयक्तिक या दोन्हीही प्रकाराम ध्ये घवघवीत यश मिळवून आकाशाला गवसणी घातली.

१४ वर्षे वयोगटांमध्ये लांब उडी मध्ये वैयक्तिक स्पर्धेमध्ये शिवांजली समाधान साठे हिने प्रथम क्रमांक पटकाविला.

तर रवी राठोड याने तिसरा क्रमांक प्राप्त केला.

सतरा वर्षे वयोगटांमध्ये अक्षरा दिनकर साठे हिने प्रथम क्रमांक मिळविला.

राजवीर विठ्ठल भोसले याने प्रथम क्रमांक पटकाविला तर १९ वर्ष वयोगटांमध्ये समीक्षा कानिफनाथ शिरसागर प्रथम क्रमांक मिळविला तर दिव्या दत्तात्रय गुंड हिने द्वितीय क्रमांक तर सिद्धी सोमनाथ घडमोडे तिने तृतीय तर मुलांमध्ये अजिंक्य वाघमोडे आणि विश्वजीत भोसले यांनी दुसरा आणि तिसरा क्रम ांक पटकाविला. सांघिक मध्ये विजयसिंह मोहिते पाटील कनिष्ठ महाविद्यालयाने यशाचे शिखर प्राप्त केले.

१९ वर्ष वयोगटामध्ये म ुलींमध्ये क्रिकेट सामन्यांमध्ये प्रथम क्रमांक पटकाविला तर मुलांनी कबड्डी आणि क्रिकेटमध्ये उपविजेतेपद मिळवले.

जिजाऊ ज्ञान मंदिर १७ वर्षे वयोगटात क्रिकेटमध्ये मुलींनी उपविजेतेपद मि ळवले.

अशाप्रकारे जिजाऊ ज्ञान मंदिर च्या विद्यार्थ्यांनी अतिशय नेत्र दीपक आणि नयनरम्य यश मिळवत जिल्ह्यामध्ये आपले आणि आपल्या शाळेचे नाव रोशन केले आहे. या यशाबद्दल संस्थेचे संस्थापक अध्यक्ष गणेश नीळ प्राचार्य सुषमा निळ यांनी यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून सत्कार केला आहे. क्रीडा शिक्षक दिलीप भोसले यांचे विद्यार्थ्यांना मार्गदर्शन लाभले.

---

# 'डीसीसी'च्या वतीने जिल्ह्यातील पूरग्रस्तांसाठी भरीव मदत

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर/प्रतिनिधी : सोल-ापूर जिल्ह्यात नैसर्गिक आपत्तीम ुळे शेतकरी, सामान्य नागरिकांना महापुराचा मोठा फटका बसला असून यातून सावरण्यासाठी एक हात मदतीचा म्हणून सोल-ापूर जिल्हा मध्यवर्ती बँक कर्मचाऱ्यांच्या वतीने ११ लाख रुपयांची भरीव मदत केली आहे, अशी माहिती प्रशासक कुंदन भोळे यांनी दिली आहे.

सामाजिक बांधिलकी व शेतकऱ्यांची बँक म्हणून या मदतीमध्ये जिल्हा बँकेच्या कर्मचाऱ्यांचासुध्दा खारीचा वाटा असावा या उद्देशाने य म ानवतेच्या दृष्टीकोनातून आर्थिक मदत करणे जरुरीचे होते. या दृष्टीने बँकेतील सर्वस्तरीय बँक कर्मचाऱ्यांतर्फे ११ लाख तर ५ लाख दिले शिक्षणासाठी

सोलापूर डीसीसी बँक ही शेतकऱ्यांची बँक म्हणून ओळ-खली जाते. शेतकरी हा बँकेचा महत्वाचा भाग असून आलेला नैसर्गिक आपत्तीमुळे अडचणीत सापडला आहे. मानवतेच्या दृष्टीने एक हात मदतीचा या दृष्टीने ११ लाख रुपये अक्षय पात्र योजनेस देण्यात आले आहे. ५ लाख १७ हजार रुपये बाधित गावातील शालेय विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य वितरणासाठी देण्यात येणार आहे. - कुंदन भोळे, प्रशासक, डीसीसी बँक, सोलापूर अधिकारी, कर्मचाऱ्यांचे एक दिवसाच्या वेतनाची होण-ारी एकूण रक्कम १६,१६,९१६ रुपयांपैकी रु. ११ लाख रुपयांचा धनादेश जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांच्या सोल-ापूर यांचे सुचनेनुसार अक्षयपात्र फौंडेशन या सेवाभावी संस्थेस बँकेचे प्रशासक कुंदन भोळे, मुख्य कार्यकारी अधिकारी राजेंद्र शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली आरटीजीएसद्वारे अदा करण्यात

साहित्य आली आहे. उर्वरीत रक्कम ५,१६,९१६ रुपये ही बँकेच्या अधिकारी व कर्मचारी वेल्फेअर ट्रस्टच्या माध्यमातून बाधित गावातील शालेय विद्यार्थ्यांना शालोपयोगी वितरणासाठी देण्यात येणार आहे. जिल्हा बँकेतील कर्मचाऱ्यांनी पूरग्रस्त बाधित शेतकयांना माणुसकीच्यादृष्टीने दिलेल्या म दतीमुळे जनसामान्यामध्ये कौतुक होत आहे.

---

# मीरा-भाईंदर, ठाणे मुंबई येथील स्वामी भक्तांकडून अक्कलकोट तालुक्यातील पूरग्रस्तांना मदतीचा हात

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**



अक्कलकोट : तालुक्यातील रामपूर, बोरी उमरगे, मिरजगी, कंठेहळळी गावातील सुमारे १०० पुरग्रस्थ कुटुंबांना मीरा-भाईंदर, ठाणे मुंबई येथील स्वामी भक्तांकडून मदतीचा हात देत दैनंदिन जीवनोपयोगी अन्नधान्य पदार्थ असलेले किट वाटप करून आधार देण्याचा अनुकरणनीय कार्य केल्याबद्दल नागरिकांतून आनंद व्यक्त करत आहे.

नुकतेच संपूर्ण सोलापूर जिल्ह्यामध्ये अतिवृष्टी आणि महापुराने नदीकाठचा शेकडो गावांना तडाखा बसले असून नदीकाठाचे लोकांना खूप नुकसान झाले आहे. अनेक गावामध्ये अनेक घरे पूर्ण पाण्यात होते.शेतीचे खूप मोठे नुकसान झाले असून नुकसान झालेल्या गावातील गोरगरीब शेतकऱ्यांना मदतीचा हात देण्यासाठी अनेक संघ संस्था पुढे सरसावले असून मीरा-भाईंदर,ठाणे मुंबई येथील स्वामी भक्त असलेले नेहमी स्वामी सम र्थांच्या दर्शनासाठी येणारे मुंबई येथील विजय पाटील, अभिराज मोरे, प्रदीप पटणे, म हेश घोगरे,विजय पाटील, महेश म ालुसरे, प्रतीक सुर्वे मित्र परिवारातर्फे अक्कलकोट तालुक्यातील पूरग्रस्त लोकांना दैनंदिन जीवनोपयोगी अन्नधान्य पदार्थ किट रामपूर, बोरी उमरगे, मिरजगी, कंठेहळ्ळी या गावा-तील प्रत्यक्ष नुकसानग्रस्थ सुमारे १०० कुटुंबांना वितरण करून मनाचे मोठेपणा दाखविले आहे. मदतीचे हात मिळाल्याने सर्व कुटुंब आणि ग्रामस्थ आनंदित झाले होते.

पूरग्रस्त मदत वितरण साठी विजय पाटील मित्रमंडळाचा सहकारी तोळनूर येथील श्रीशैल रब्बा, शरणप्पा फुलारी, रविकुम ार देगांव, जकापूरचे भागण्णा पाटील, आकाश समाणे, कंठेहळळीचे दस्तगीर जमादार आदींचे सहकार लाभले शरणप्पा फुलारी यांनी स्वागत केले तर श्रीशैल रब्बा आभार मानले.

---

**मातेश्वरी देवी यात्रा उत्साहात साजरी**

**धार्मिक, सामाजिक, सांस्कृतिक उपक्रमांचे आयोजन**

# आई राजा उदो उदो. सदानंदीचा उदो उदो. च्या गजरात टाकळीचा परिसर दुमदुमला

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

अक्कलकोट/प्रतिनिधी : आई राजा उदो उदो, सदानंदीचा उदो उदो अशा घो-षणात टाकळीचा परिसर घुमून गेला होता निमित्त होते नवरात्र महोत्सवाच्या ज्योत आगमनाचे सालाबादाप्रमाणे यंदाही नविन टाकळी येथील श्री मातेश्वरी देवी नवरात्र महोत्सव कमिटीच्या वतीने तुळजापुर येथून ज्योत प्रज्वलित करून टाकळी येथे मोठ्या भक्तिभावाने आणण्यात आले.




नवरात्र महोत्सवाचे औचित्य साधून टाकळी येथे वेगवेगळे सामाजिक, सांस्कृतिक उपक्रम राबविले जातात. घटस्थापनेपासून ते दसरा सणापर्यंत गा-वातील स्थानिक महिला एकत्रित येऊन देवीचा जागर करतात. यंदाच्या वर्षी नवरात्र महोत्सवात टाकळीचे स्थानिक कलाकार विश्वा काटे, बिरु वग्गे, माळु पुजारी, क्वीन सोना कांबळे, कविता कलबुर्गी, पार्वती सुलेरजवळगी, श्वेता माशाळ, सोमु टाकळी यांच्या हुग-ार कलातंड मेलोडीज ऑर्केस्ट्रा या सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या ऑर्केस्ट्राचे प्रमुख गायक प्रशांत कराटगी यांनी कन्नड जानपद गाऊन लोकांचे मनोरंजन केले. आईची महती सांगणारे कन्नड गीत गाऊन लोकांचे प्रबोधन केले.

या ऑर्केस्ट्रा कार्यक्रमाचे उद्घाटन टाकळीचे रवी बगले, दीप प्रज्वलन उपसरपंच सिद्धाराम घोडके, अंबादास दूधभाते, दयानंद दूधभाते, शिवशरण दूधभाते यांनी तर माता अंबाबाई व अंबाबाईंचे नितीन भक्ती करणारे रत्नाबाई लोणीकर यांच्या प्रतिमेचे पूजन पोलीस विजय बनसोडे, मडिवाळेश्वर कट्टीमनी सर, दिलीप चांदकवटे, रमेश साबळे, सिद्धप्पा तेली यांच्या हस्ते करण्यात आले. प्रमुख मान्यवरांचे सन्मान मंदिरा-चे पुजारी विद्यानंद लोणीकर, शांतप्पा दुधभाते, राजशेखर गायगवळी, बसवराज सुतार, सिद्धाराम मधुरे, श्रीकांत सुतार, शिवानंद मगी यांनी केले.

कार्यक्रमाचे यशस्वी सूत्रसंचलन टाकळीचे ग्रामपंचायत सदस्य चंद्रशेखर गायगवळी यांनी केले.

या सांस्कृतिक कार्यक्रमासाठी महिला व युवकांची मोठी गर्दी होती. युवकांनीही नवख्या गायकांच्या कलेचा आदर करत व त्यांना प्रोत्साहन देत मोठ्या जोशात कार्यक्रम पार पडला.

---



# सुप्रभात मंडळाच्या वतीने पूरग्रस्तांना वस्तू, कपडे वाटप

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : सोल-ापूर जिल्ह्यातील अतिवृष्टीमुळे नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना म ाढा तालुक्यातील पुरामुळे अनेक नागरिकांची नुकसान झाले आहे म्हणून पंढरपुरातील तुळशी वृंदावन, व जय हरी, सुप्रभात मंडळाच्या वतीने जीवनावश्यक वस्तू व कपडे वाटप करण्यात आले.

माढा तालुक्यातील अनेक नागरिकांच्या घरात पुराचे पाणी गेले त्यामुळे नागरिकांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले. म्हणून नागरिकांना मदत करावी असे आव्हान माढा तालुक्याचे लोकप्रिय आमदार अभिजीत पाटील यांनी केले होते. यास प्रतिसाद देऊन पंढरपुरातील तुळशी वृंदावन, जय हरी, सुप्रभात ग्रुपच्या वतीने पूरग्रस्तांना जीवनावश्यक वस्तू व कपडे, यांनी श्री नारायण गंजेवार, पांडुरंग बापट, बापू गोसावी, मंगेश देशपांडे, यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी पूरग्रस्तांनी समाधान व्यक्त केले.

# विद्यार्थ्यांनो, स्पर्धात्मक युग आहे कौशल्य आत्मसात करा, यश नक्की मिळेल

## कर सल्लागार शुभम चव्हाण; कल्याणशेट्टी महाविद्यालयात कॉमर्स असोसिएशन तर्फे करिअर मार्गदर्शन कार्यशाळा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

प्रतिनिधी/अक्कलकोट : माहिती आणि तंत्रज्ञानामुळे स्पर्धात्मक युग सुरू आहे बेकारी वाढत आहे, बँकांची स्थिती विचित्र झाली आहे, म्हणून वाणिज्य विद्या शाखेतील विद्यार्थ्यांनी आर्थिक विकासाचे कौशल्य आत्मसात करावे यश नक्की मिळते, स्वतः चा व्यवसाय देखील सुरू करता येतो असे प्रतिपादन संसाधन व्यक्ती म्हणून प्रख्यात कर सल्लागार शुभम चव्हाण यांनी व्यक्त केले.

महर्षी विवेकानंद समाजकल्याण संस्था संचलित मातोश्री गुरुबसव्वा कल्याणशेट्टी महाविद्यालयातील कॉमर्स असोसिएशनच्या वतीने आयोजित करियर मार्गदर्शन कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती, त्यावेळी ते बोलत होते अध्यक्षस्थानी संस्थेचे जेष्ठ संचालक मल्लिनाथ कल्याणशेट्टी होते. व्यासपीठावर प्राचार्य डॉ राजेंद्रसिंह लोखंडे, मुख्याध्यापक मलकप्पा भरमशेट्टी, विभाग प्रमुख प्रा शिल्पा धूमशेट्टी उपस्थित होते.

### कार्यशाळेत विद्यार्थिनींकडून प्रश्नाची सरबत्ती

**करियर गायडन्स कार्यशाळा प्रसंगी उपस्थित विद्यार्थिनींनी वाणिज्य विद्याशाखेतून पदवीधर झाल्यानंतर कोणते कोर्सेस करावेत, त्यासाठी अभ्यासाची वाटचाल कशी करावी. स्पर्धा परीक्षेसाठी तयारी कशी केली पाहिजे असे अनेक प्रश्न सी ए शुभम चव्हाण यांना विचारले. त्याचे त्यांनी समर्पक उत्तरे दिली.**

कार्यशाळेत पुढे बोलताना ते म्हणाले, वाणिज्य पदवीधरांना चार्टर्ड अकाउंटंट, कंपनी सेक्रेटरी, कर सल्लागार, बँक मॅनेजर, इव्हेंट मॅनेजर अशी रोजगाराची संधी उपलब्ध आहेत. परंतु त्यासाठी मेहनत घ्यावी लागते अर्थव्यवस्थेचा अभ्यास करावा लागतो, चालू घडामोडी समजून घ्याव्या लागतात, कोर्सेस पूर्ण करावे लागतात त्यामुळे यशाचा मार्ग सुलभ होतो.

मल्लिनाथ कल्याणशेट्टी म्हणाले की चार्टर्ड अकाउंटंट, कंपनी सेक्रेटरी होण्यासाठी अभ्यास करावा लागतो, मेहनत घ्यावी लागते, फाउंडेशन परीक्षा पास झाल्यानंतर जिद्दीने चिकाटीने पुढील परीक्षा द्यावी लागते, अत्यंत कठीण मेहनत घेतल्यानंतर यश प्राप्त होते म्हणून विद्यार्थ्यांनी मोठी स्वप्ने पाहिली पाहिजेत.



कार्यशाळेचे प्रास्ताविक डॉ एस आर लोखंडे यांनी केले सूत्रसंचलन प्रा जनाबाई चौधरी यांनी केले आभार प्रा डॉ बाळासाहेब पाटील यांनी मानले यशस्वीतेसाठी प्रा शितल फुटाणे यांनी प्रयत्न केले.

---

# पडघा येथिल शिवसेना (ठाकरे) मनसे यांच्या टोल बंद आंदोलनाला यश




**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

ठाणे प्रतिनिधी/मिलिंद जाधव

मुबई , नाशिक महामार्गावरील विविध मागण्यांसाठी शिवसेना ठाकरे गट, मनसे व इतर सामाजिक संघटना कडून करण्यात आलेल्या पडघा टोल बंद आंदोलनाला यश आले असून आंदोलनकर्त्याच्यां मागण्या मंजूर करण्यात आल्याने परिसरात समाधान व्यक्त होत आहे. महामार्गावरील खराब, सर्विस रस्ते यांची तात्काळ दुरुस्ती करून गटार बांधणे, पथदिवे बसवणे, आवश्यक तेथे महामार्गावर अंडरपास तयार करणे, महामार्गालगत गावातील रस्ते दूरुस्त करुन सर्वीस रस्ते तयार करणे, तळवली नाका अंडरपासचे काम लवकर करणे ,शेरेकर पाडा येथे जाण्यासाठी अंडरपास तयार करणे.व इतर मागण्यांसाठी १७ जुलै रोजी शिवसेना (ठाकरे) मनसे व इतर सामाजिक संघटनेच्या वतीने शिवसेना (ठाकरे) उपजिल्हाप्रमुख प्रकाश भोईर ,मनसे भिवंडी लोकसभा जिल्हाप्रमुख शैलैश बिडवी, सामाजिक कार्यकर्ते भगवान सांबरे यांच्या मार्गदर्शनाखाली पडघा येथे टोल बंद आंदोलन व मोर्चाचे आयोजन करण्यात आले होते.यावेळी १९ मागण्यांचे निवेदन प्रकल्प संचालक भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण यांना देण्यात आले होते. त्याची गंभीर दखल शासन स्तरावर घेऊन विविध प्रसार माध्यमांकडून दखल घेण्यात आली होती. या आंदोलनाला चांगले यश आले असुन वडपे ते पिंपरी या महामार्गावर असलेल्या गावांसाठी आवश्यक तेथे अंडरपास, सर्वीस रस्ते, पथदिवे, गटारी बनविण्यात येणार असुन शेरेकरपाडा अंडरपास निवीदा प्रक्रीयेत असुन लवकरच त्याचे कामे सुरू होणार असुन आवश्यक तेथे अंडरपास, उड्डाणपूल मंजुरीसाठी असुन महामार्गावरील २९० कोटी रुपयांची विविध कामे प्रस्तावित असल्याची माहिती राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ३ चे प्रोजेक्ट डायरेक्टर श्रीकांत ढगे यांनी मंगळवारी पडघा येथील महावितरण विश्रामगृहात पार पडलेल्या बैठकीत दिली .यावेळी शिवसेना (ठाकरे) उपजिल्हाप्रमुख प्रकाश भोईर ,मनसे भिवंडी लोकसभा जिल्हाप्रमुख शैलैश बिडवी,सामाजिक कार्यकर्ते भगवान सांबरे, शिवसेना ठाकरे गटाचे उपनेते विश्वास थळे, जिल्हाप्रमुख कुंदन पाटील, राष्ट्रवादी(शरद पवार गट) तालुका अध्यक्ष गणेश गुळवी, शिवसेना महिला आघाडी तालुकाध्यक्ष फशीताई पाटील, पडघा पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक जितेंद्र ठाकुर, सामाजिक कार्यकर्ते प्रफुल शेलार, भास्कर माळी, संजय पटेल, रुपेश कुडुसकर, पंकज भोईर उपस्थित होते.

### आंदोलनकर्त्यांच्या मागण्या मंजूर; लवकरच होणार कामाला सुरुवात

---

# उडगी येथे भारतीय डाक विभागाचा मेळावा उत्साहात

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

अक्कलकोट/प्रतिनिधी : अक्कलकोट तालुक्यातील उडगी येथे भारतीय डाक विभागाचा मेळावा उत्साहात संपन्न झाला या मेळाव्यात नागरिकांना विविध बचत योजनांची सविस्तर माहिती देण्यात आली.

मंगळवार दिनांक दि. ०७/१०/२०२५ रोजी अक्कलकोट तालुक्यातील उडगी येथे भारतीय डाक विभाग चा मेळावा आयोजित करण्यात आला.

या मेळाव्याचे कार्यक्रमाचे अध्यक्ष सरपंच बसवराज कोळी यांनी स्वीकारले. यावेळी भारतीय डाक दक्षिण उपविभाग सोलापूर विभागचे सहाय्यक अधीक्षक श्री.अनिल साळुंखे सर यांचा सत्कार सरपंच बसवराज कोळी आणि सोलापूर दक्षिण उपविभागचे डाक आवेक्षक भेंडे सर यांचा सत्कार उपसरपंच सुनील मोरे यांच्या हस्ते करण्यात आला.

### विविध बचत योजनांची नागरिकांना मिळाली माहिती

या मेळाव्यात भारतीय डाक विभाग मार्फत राबविण्यात येणाऱ्या विविध योजनांची माहिती दिली. जसे की, बचत खाते ,सुकन्या खाते, अवर्ती खाते तसेच जीवन विमा व अपघाती विमा ची ही माहिती दिली.लहान मुलांचे नवीन आधार कार्ड नोंदणी, आधार कार्ड ला मोबाईल लिंकिंग करणे.

गावातील नागरिकांना सर्व योजनांची संपूर्ण माहिती दिली.

यावेळी उपसरपंच सुनील मोरे,ग्रामपंचायत सदस्य महादेव धानशेट्टी, पोलीस पाटील भौरम्मा माळी, जिल्हा परिषद प्राथमिक शाळेचे मुख्याध्यापक पुजारी सर, उडगी गावचे पोस्टमास्तर कावेरी मॅडम, बोरोटीचे पोस्टमास्तर बाबू गुड्डेवाडी. हैद्रा चे पोस्टमास्तर कोगनूर, सातनदुधनी पोस्टमास्तर वैष्णवी गोपनपल्ली बासलेगाव गावचे पोस्टमास्तर पवन बिराजदार, तसेच खातेदार आणि ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

---

# फेबटेक पॉलिटेक्निकल मधील इलेक्ट्रॉनिक्स अँड टेली कम्युनिकेशन इंजिनियरिंग विभागात पालक मेळावा उत्साहात



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी

फॅबटेक पॉलिटेक्निक मधील इलेक्ट्रॉनिक्स अँड टेलीकमुनिकेशन इंजीनियरिंग विभागात शनिवारी दिनांक ४ ऑक्टोबर २०२५ रोजी पालक मेळावा आयोजित करण्यात आला होता व या पालक मेळाव्या मोठ्या उत्साहात संपन्न झाला असल्याची माहिती प्राचार्य तानाजी गुरगुले यांनी दिली इलेक्ट्रॉनिक्स अँड कमुनिकेशन इंजीनियरिंग विभागात आयोजित करण्यात आलेल्या पालक मेळाव्यात विभाग प्रमुख प्राध्यापक महेश वाळुंजकर यांनी प्रास्ताविक करून विभागाचा आढावा उपस्थित पालकांसमोर सादर केला.

या दरम्यान इलेक्ट्रॉनिक्स अँड कम्युनिकेशन्स इंजिनिअरिंग विभागाच्या वतीने घेण्यात आलेल्या चाचणी परीक्षेत उज्वल यश संपादन केलेल्या विद्यार्थ्यांचा महाविद्यालयाच्या वतीने बक्षीस देऊन अभिनंदन करण्यात आले.

हा मेळावा यशस्वी करण्यासाठी इलेक्ट्रॉनिक्स अँड टेली कम्युनिकेशन इंजीनियरिंग विभागातील सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले व या मेळाव्याचे सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन प्राध्यापक गणेश शिंदे यांनी केले.

---

# एमआयटी ज्युनियर कॉलेजचे जिल्हास्तरीय बास्केटबॉल स्पर्धेत यश

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : क्रीडा व युवक सेवा संचालनालय महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्या वतीने आयोजित जिल्हास्तरीय बास्केटबॉल स्पर्धा सांगोला येथील विद्यामंदिर विद्यालयात संपन्न झाल्या. या स्पर्धेत वाखरी, पंढरपूर येथील एमआयटी ज्युनियर कॉलेजच्या संघाने उल्लेखनीय कामगिरी केली.



स्पर्धेमध्ये १९ वर्षांखालील मुलांच्या संघाने तृतीय क्रमांक पटकावला, तर १९ वर्षांखालील मुलींच्या संघानेही तृतीय क्रमांक मिळवत महत्त्वपूर्ण यश संपादन केले. विशेष म्हणजे या स्पर्धेतून श्रवण इंगळे, सुजल अग्रवाल आणि दिव्या लोकरे या विद्यार्थ्यांची पुणे विभागीय स्पर्धेसाठी निवड झाली असून, आगामी विभागीय स्तरावरील स्पर्धेमध्ये ते जिल्ह्याचे प्रतिनिधित्व करणार आहेत.

या उत्कृष्ट कामगिरीबद्दल मुख्याध्यापिका शिबानी बॅनर्जी आणि प्राचार्य डॉ. स्वप्नील शेठ यांनी संस्थेच्या वतीने सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून त्यांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

---

## आरोपीवर कठोर कारवाई करा

## विवेक विचार मंचची मागणी

# सरन्यायाधीश भूषण गवई यांच्यावर झालेल्या हल्ल्याच्या प्रयत्नाचा तीव्र निषेध

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर/प्रतिनिधी

सर्वोच्च न्यायालयाचे मा. सरन्यायाधीश भूषण गवई यांच्यावर झालेल्या हल्ल्याच्या निषेध व आरोपीवर कठोर कारवाई करण्याबाबत निवासी जिल्हाधिकारी श्री अभिजीत पाटील यांना विवेक विचार मंचच्या वतीने निवेदन देण्यात आले.



सर्वोच्च न्यायालयाचे सरन्यायाधीश माननीय श्री भूषण गवई यांच्यावर राकेश किशोर नावाच्या व्यक्तीने हल्ला करण्याचा प्रयत्न केला, हा प्रकार अतिशय दुर्दैवी, असंविधानिक व निंदनीय आहे, या घटनेचा आम्ही विवेक विचार मंच तीव्र निषेध करीत आहे

देशाच्या सर्वोच्च न्यायसंस्थेच्या प्रमुखांवर अशा प्रकारचा अवमानकारक हल्ल्याचा प्रयत्न हा केवळ एका व्यक्तीवरचा हल्ला नसून, तो भारतीय न्यायव्यवस्थेच्या प्रतिष्ठेवरचा गंभीर आघात आहे. भारतीय लोकशाहीत मतभेद, निषेध व्यक्त करण्याचे कायदेशीर मार्ग उपलब्ध आहेत. अशा प्रकारे हल्ला करणे असंविधानिक, असभ्य व अवमानजनक कृत्य आहे. सुबुद्ध भारतीय नागरिक या घटनेचा देशभरातून निषेध व्यक्त करत आहेत.

काही समाजद्रोही, फुटीरतावादी तसेच राजकीय शक्ती या घटनेच्या माध्यमातून समाजात द्वेष व जातीय, धार्मिक तेढ निर्माण करत आहेत याचाही आम्ही निषेध करतो. हा प्रकार कोणत्याही धर्माशी किंवा समाजाशी संबंधित नसून विकृत व असंविधानिक मानसिकतेचा परिणाम आहे.

न्यायसंस्थेचा सन्मान राखणे ही प्रत्येक भारतीयाची नैतिक जबाबदारी आहे. त्यामुळे आम्ही, विवेक विचार मंच महाराष्ट्र यांच्या वतीने, या घृणास्पद व असंविधानिक कृत्याचा अत्यंत तीव्र शब्दांत निषेध व्यक्त करतो व या घटनेची सखोल चौकशी करून आरोपीवर कठोर कारवाई करावी.माननीय सरन्यायाधीश यांनी जरी कारवाई करण्याचे निर्देश दिले नसले तरी सरकारने स्वतःहून तक्रार/गुन्हा दाखल करून कायदेशीर कारवाई करावी. अशा प्रकारच्या घटनांची पुनरावृत्ती होऊ नये यासाठी ठोस बळकट सुरक्षा व्यवस्था व आवश्यक उपाययोजना कराव्यात अशी मागणी विवेक विचार मंच वतीने करण्यात आले.

यावेळी सोलापूर विवेक विचार मंचच्या जिल्हा संयोजिका अश्विनी चव्हाण, शहर संयोजक ड. प्रशांत कांबळे, लीगल एड प्रमुख ॲड. वैशाली महिंद्रकर, कार्यक्रम सहप्रमुख प्रीती उडानशिव, मीडिया प्रमुख ॲड. संदेश देवकर, श्री दशरथ वडतिले, ॲड. जितेंद्र मोरे, श्री लक्ष्मण शेटे, ॲड. आरती आंबीगर, श्रीमती पद्मा तारके, श्री नितीन कांबळे आदी उपस्थित होते.

---

# भारत-ब्रिटन भागीदारी जागतिक स्थैर्य आणि आर्थिक प्रगतीसाठी महत्त्वाचा आधार : प्रधानमंत्री नरेंद्र मोदी

(पान १ वरून...)

करार झालेला असून, त्याअंतर्गत भारतीय वायुसेनेचे उड्डाण प्रशिक्षक आता युकेच्या रॉयल एअरफोर्समध्ये प्रशिक्षक म्हणून काम करणार आहेत. मुंबईत बैठक चालू असताना, आपल्या नौदलांची जहाजे 'कोंकण २०२५' हा संयुक्त सराव करत आहेत. हा आमच्या मजबूत सामरिक सहकार्याचा पुरावा असल्याचे प्रधानमंत्री मोदी यांनी नमूद केले.

युकेमध्ये वास्तव्यास असलेले १८ लाख भारतीय हे दोन्ही देशांमधील मैत्रीचे जिवंत उदाहरण आहे. त्यांनी ब्रिटिश समाज आणि अर्थव्यवस्थेत दिलेले योगदान अत्यंत मोलाचे असून दोन्ही देशांतील मैत्री आणि विकासाच्या पुलाला बळकटी दिली आहे, असेही प्रधानमंत्री मोदी यांनी यावेळी सांगितले.

भारताची गतिशीलता आणि युकेची तज्ञता मिळून एक अद्वितीय सुसंवाद निर्माण होतो. आमची भागीदारी प्रतिभा, तंत्रज्ञान आणि विश्वासावर उभी आहे. आम्ही दोन्ही देशांच्या लोकांसाठी उज्ज्वल भविष्य घडवू, असा विश्वास प्रधानमंत्री मोदी यांनी यावेळी व्यक्त केला.

भारत-युके भागीदारीचा नवा अध्याय : मानवी नात्यांचा सेतू अधिक मजबूत करण्याची वचनबद्धता : ब्रिटनचे पंतप्रधान कीर स्टार्मर

भारत आणि ब्रिटन यांच्यातील मानवी बंध हेच या नात्याचे खरे वैशिष्ट्य आहे. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी सांगितल्याप्रमाणे, हे दोन देशांदरम्यानचे, लोकांदरम्यानचा, मनांदरम्यानचा जिवंत पूल आहे, असे ब्रिटनचे पंतप्रधान कीर स्टार्मर यांनी आज मुंबईत आयोजित द्विपक्षीय बैठकीनंतर जारी केलेल्या संयुक्त निवेदनादरम्यान सांगितले.

कीर स्टार्मर म्हणाले, भारत-युके एकत्र येऊन आधुनिक आणि भविष्याभिमुख भागीदारी निर्माण करत आहेत. यामुळे दोन्ही देशांच्या नागरिकांसाठी नव्या संधी निर्माण होतील. युके-भारत सर्वसमावेशक आर्थिक आणि व्यापार करार (उएढ) पूर्ण करणे हा ऐतिहासिक टप्पा आहे. या करारामुळे आयात शुल्क कमी होईल, बाजारपेठांमध्ये अधिक प्रवेश मिळेल, रोजगारनिर्मिती होईल आणि दोन्ही देशांतील जनतेचे जीवनमान उंचावणार आहे. कराराच्या आर्थिक लाभांपलीकडे जाऊन, या प्रक्रियेत निर्माण झालेला आत्मविश्वास आणि परस्पर सहकार्याचा भाव हे भारत-युके संबंध अधिक दृढ करत असल्याचेही कीर स्टार्मर यांनी नमूद केले.

ही बैठक भारताची आर्थिक राजधानी मुंबईत होत आहे, हे प्रतीकात्मक आहे. भारताची आर्थिक प्रगती विलक्षण आहे. २०२८ पर्यंत जगातील तिसऱ्या क्रमांकाची अर्थव्यवस्था बनण्याचे उद्दिष्ट आणि 'विकसित भारत २०४७' या दृष्टिकोनाबद्दल मी प्रधानमंत्री मोदी यांचे अभिनंदन करतो. या प्रवासात आम्ही भारताचे भागीदार व्हावे, ही आमची इच्छा आहे, असेही त्यांनी यावेळी सांगितले.

या भेटीदरम्यान भारत-युके व्यापार कराराच्या संधींना वास्तवात आणण्यासाठी ब्रिटनकडून १२६ कंपन्यांचे सर्वात मोठे व्यावसायिक प्रतिनिधीमंडळ भारतात आले असल्याची माहिती त्यांनी दिली.

कीर स्टार्मर म्हणाले, युके आणि भारत हे तंत्रज्ञान आणि नवोन्मेष क्षेत्रातील आघाडीचे देश आहेत. त्यामुळे कृत्रिम बुद्धिमत्ता, प्रगत संवाद व्यवस्था, संरक्षण तंत्रज्ञान यांसारख्या क्षेत्रांमध्ये सहकार्य अधिक मजबूत करण्याचा आमचा संकल्प आहे.

बॉलीवूड चित्रपटांचे चित्रीकरण युकेमध्ये करण्यासाठी करार जाहीर करण्यात आल्याचेही त्यांनी सांगितले. शिक्षण क्षेत्रात भागीदारी वाढवण्याच्या दृष्टीने सर्व ब्रिटिश विद्यापीठे भारतामध्ये आपले कॅम्पस सुरू करणार असल्याची घोषणा त्यांनी केली. यामुळे ब्रिटन भारताचा अग्रगण्य आंतरराष्ट्रीय शिक्षण भागीदार बनेल आणि व्हिजन २०३५ ला मूर्त रूप मिळेल, असेही ते म्हणाले.